# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४११००४

## परिपत्रक क्र.रा.मं./परीक्षा-६/३९६१ दिनांकः-०७/०७/२०१६

विषयः- इ.११ वी ए.टी.के.टी प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या इ.१२ वी प्रवेशाबाबत कनिष्ठ महाविद्यालय/ उच्च माध्यमिक शाळांकडून प्राप्त झालेल्या अडचणी/तक्रारींबाबत...

या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस सर्व विषय घेऊन प्रविष्ठ झालेला आणि कमाल दोन विषयात अनुत्तीर्ण झालेला विद्यार्थी शासन निर्णय क्रमांक एचएससी-२००९/१६७/०९/ उमाशि-२ दिनांक १७ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयानुसार ए.टी.के.टी सवलत घेवून इयत्ता ११ वी मध्ये तात्पूरता प्रवेश घेण्यास पात्र ठरतो. ए.टी.के.टी. व्दारे इयत्ता ११ वीला प्रविष्ट होवून पुढील वर्षी विद्यार्थ्यांना इ.१२ वी मध्ये प्रवेश घेताना येणाऱ्या अडचणींबाबत या कार्यालयाकडे विभागीय मंडळांमार्फत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात येत आहे.

१. जर एखादा विद्यार्थी ए.टी.के.टी. व्दारे इ.११ वीत प्रविष्ठ होऊन पुढील जुलै-ऑगस्ट व मार्चच्या परीक्षेतील दोन संधीत इ.१० वीला अनुत्तीर्ण विषयात उत्तीर्ण होऊ शकला नाही व त्यापुढील तिसऱ्या/चौथ्या संधीत परीक्षेत उत्तीर्ण झाला तर अशा विद्यार्थ्यांस पुढील शैक्षणिक वर्षात जून मध्ये इ.१२ वी मध्ये प्रवेश देता येईल.

२. इ.११ वीचा निकाल इ.१० वी पास झाल्यानंतर जाहीर करावा.

३. विद्यार्थ्यांच्या इ.११ वी गुणपत्रिकेवर निकाल उशीरा का जाहीर केला याबाबत सदर विद्यार्थी ए.टी.के.टी. ची सवलत घेवून प्रविष्ट झालेला असल्याने इ.११ वी निकाल उशीराने जाहीर केला आहे असे नमूद करावे.

४. केवळ निकषानुसार दिलेल्या दोन संधीमध्ये इ.१० वीची परीक्षा उत्तीर्ण नाही म्हणून सदर विद्यार्थ्याला इ.१२ वी प्रवेश नाकारून इ.११ वी मध्ये पुन्हा प्रवेश घ्यायला लावू नये. कारण सदर विद्यार्थ्यांस त्याच्या शैक्षणिक कालावधीमध्ये दोन वेळेला इ.११ वीची परीक्षा द्यावी लागणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

५. विज्ञान शाखेकडे ए.टी.के.टी. ने प्रवेश देताना अधिसूचनेतील सुधारित तरतुदीनुसार विज्ञान विषयात किमान ३५% गुणांची मर्यादा पाळण्यात यावी.

६. एखाद्या तुकडीमध्ये ए.टी.के.टी. विद्यार्थ्यांचे प्रमाण किती असावे याबाबत मार्गदर्शन/सूचना विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयाकडून घेण्यात याव्यात.

तरी उपरोक्त परिपत्रकानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत विभागीय मंडळांनी त्यांच्या कार्यकक्षेत येणाऱ्या माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना कळवावे.

(कृष्णकुमार पाटील)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे -०४

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

विभागीय सचिव, सर्व विभागीय मंडळे यांना कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेत येणाऱ्या सर्व मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांना आपल्यामार्फत कळविण्यात यावे.

प्रत-

१. मा.अवर सचिव, एसडी-२, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
२. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, शिक्षण आयुक्तालय, बालभारती आवार, पुणे-०४
३. मा.शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-३०
४. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व विभाग)
५. शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद सर्व